नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - ३३५<br>Issue - 335 | वार बुधवार दि. २३ एप्रिल २०२५<br>Blow- Wednesday Date 23 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# काश्मीरमध्ये पर्यटकांवर दहशतवादी हल्ला; २७ जणांचा मृत्यू

## जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला; सैनिकी गणवेशात येऊन केला अंधाधुंद गोळीबार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पहलगाम : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल मोठी माहिती पुढे येताना दिसतंय. दहशतवाद्यांनी मंगळवारी बैसरन-पहलगाममध्ये पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. यामध्ये अनेक पर्यटकांचा मृत्यू झाला आणि दोन डझनहून अधिक पर्यटक जखमी झाले. या भ्याड हल्ल्यात आतापर्यंत २७ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. ७ ते ८ दहशतवाद्यांनी पर्यटकांना टार्गेट करत थेट गोळीबार केला. या हल्ल्यानंतर दहशतवाद्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. सध्या त्यांचा शोध घेतला जातोय. या हल्ल्यानंतर मोठी खळबळ निर्माण झालीये. जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. धक्कादायक म्हणजे भारतीय जवानांवर नाही तर पर्यटकांवर हा हल्ला झाला आहे. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक झाली. यानंतर शाहही जम्मू-काश्मीरला रवाना झाले आहेत.





मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांच्या एका गटाला लक्ष्य करण्यात आले. हल्ल्यादरम्यान काही घोड्यांनाही गोळ्या लागल्या. सध्या सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून शोधमोहीम तीव्र केली आहे. दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, हा हल्ला दुपारी अडीचच्या सुमारास झाला. पहलगाममधील बैसरन मैदानावर २-३ बंदूकधारी सैनिकी गणवेशात आले आणि त्यांनी घोडेस्वारीचा आनंद लुटणाऱ्या पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. बैसरन व्हॅली हे पहलगामपासून काही किलोमीटर अंतरावर असलेले प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. इथे फक्त घोड्याने किंवा पायीच जाता येते. दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. गोळीबाराची घटना अशा वेळी घडली जेव्हा पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात येतात. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवर चर्चा केली आहे. पंतप्रधानांनी शहा यांना योग्य ती कारवाई करण्यास सांगितले आहे. पंतप्रधानांनी शाह यांना घटनास्थळी भेट देण्यास सांगितले आहे. दुसरीकडे शहा यांनी तातडीची बैठक बोलावली आहे. ज्यामध्ये आयबीचे गृह सचिव आणि गृह मंत्रालयाचे इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जम्मू-काश्मीरचे डीजीपी सामील झाले.

'द रेझिस्टन्स फ्रंट' म्हणजेच टीआरएफने पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तान समर्थित दहशतवादी संघटनांच्या इशाऱ्यावर काम करणारी ढठऋ गेल्या काही वर्षांपासून जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने हल्ले करत आहे.

# तात्पुरत्या स्वरुपातील १६ अतिरिक्त न्यायालये, २३ जलदगती न्यायालयांना २ वर्षांची मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात तात्पुरत्या स्वरुपात स्थापन करण्यात आलेल्या १६ अतिरिक्त न्यायालयांना व २३ जलदगती न्यायालयांना आणखी दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा तसेच त्याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.



राज्यातील दुय्यम न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची मोठी संख्या विचारात घेता, मूळ न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा ताण कमी करणे व न्यायदानात गती आणण्याकरीता १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारसीप्रमाणे १८ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयानुसार राज्यात ५ वर्षांकरिता अतिरिक्त न्यायालये व जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात आली. ही न्यायालये कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून त्यांचा ५ वर्षाचा कालावधी संपुष्टात येत आहे. त्या दिनांकापासून पुढे आणखी २ वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या न्यायालयांमधील प्रलंबित दिवाणी व फौजदारी प्रकरणांची संख्या विचारात घेता या न्यायालयांना दोन वर्ष मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाने शासनास सादर केला होता, त्यानुसार ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुदतवाढ मिळालेल्या जलदगती न्यायलयांमध्ये जिल्हा न्यायाधीश संवर्गातील संगमनेर, नेवासा, अमरावती, बीड, खामगाव, लातूर, खेड (पुणे), खेड (रत्नागिरी), कल्याण, ठाणे व नगर दिवाणी व सत्र न्यायालय दिंडोशी (मुंबई) या न्यायालयांचा समावेश आहे. तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी संवर्गातील अहमदनगर, माजलगाव, भंडारा, नांदेड, मुखेड (लिंक कोर्ट), परांडा, भूम, पनवेल, कराड, कल्याण, पुसद येथील न्यायालयांचा समावेश आहे. अतिरिक्त न्यायालयांमध्ये जिल्हा न्यायाधीश संवर्गातील अचलपूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नागपूर (मोटार अपघात दावा प्राधिकरण/चउढ), नांदेड, निफाड, वसई, परभणी, माणगाव, कराड, वडुज, पंढरपूर, बार्शी, ठाणे (मोटार अपघात दावा प्राधिकरण) तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर संवर्गातील नागपूर व नाशिक या न्यायालयांचा समावेश आहे.

या न्यायालयांकरिता आवश्यक असणारी न्यायाधीश व त्यांच्या सहाय्यभूत कर्मचारी वर्गाची पदे पुढे सुरू ठेवण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या न्यायालयांकरिता आवश्यक अशा ७८ कोटी ४६ लाख ७७ हजार ८९८ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

# मत्स्य व्यवसायाला आजपासून कृषी दर्जा; राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मत्स्य व्यवसायाला आजपासून राज्यात कृषीया दर्जा देण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा राज्यातील ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना फायदा होणार आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्र महाराष्ट्रात कृषी प्रमाणे चांगले उत्पादन आणि उत्पन्न घेण्यास सक्षम आहे. मत्स्य व्यवसायास कृषीचा दर्जा नसल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्थक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलतींपासून वंचित राहावं लागत होते. पण महाराष्ट्र राज्यात आता मत्स्य शेतीला कृषीचा दर्जा देऊन मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध होणार आहेत. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचंदेखील बळकटीकरण होणार आहे.



राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होण्याची दाट शक्यता आहे. कृषी क्षेत्रास लागणारे बियाणे, ट्रॅक्टर, तिफन, पाभर, औत, खते इत्यादींकरीता शेतकऱ्यांना लाभ मिळतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, पॅडलव्हील एअरेटर्स, एअरपंप करीता अनुदान मिळणार आहे. तसेच शीतगृह आणि बर्फ कारखान्याला अनुदान मिळणार आहे.

मच्छीमारांनाही शासनातर्फे रिलीफ पॅकेज मिळणार

शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीकविमा प्रमाणे मत्स्य शेतकऱ्यांना, मत्स्य संवर्धकांना मत्स्यबीजांच्या मत्स्योउत्पादनाच्या नुकसानीसाठी मत्स्य विमा योजना मिळणार आहे. दुष्काळ किंवा अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्ती झाल्यास कृषी क्षेत्रात ज्याप्रमाणे शेतकऱ्यांना शासनातर्फ रिलीफ पॅकेज जाहीर होतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांनाही शासनातर्फे रिलीफ पॅकेज मिळणार.

मत्स्यपालनाला कृषीचा किनारी आणि अंतर्गत आर्थिक विकास होक शकतो. रोजगार निर्माण होऊ शकतो आणि उत्पन्न मिळू शकते. मच्छीमारांना कृषी शेतकरी झाल्याने वीज शुल्कात अनुदान मिळणार आहे. मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प, संबंधित कारखाने, प्रक्रिया युनिट यांना कृषी दराने वीज मिळणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा इत्यादी आणि कृषीनुसार अल्पदराने विमा संरक्षणाचा लाभ मिळणार आहे. देशाला परकीय चलन तसेच प्रथिनयुक्त अन्न पुरविण्यात मत्स्य व्यवसायाचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्र राज्यात कृषी प्रमाणे मत्स्यव्यवसाय क्षेत्र चांगले उत्पादन आणि उत्पन्न घेण्यास सक्षम आहे. मत्स्य व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याच्या दृष्टीने वीज दरात सवलत, किसान क्रेडिट कार्ड, कृषी दरानुसार कर्ज सहाय्य, विमा दरात सवलत, उपकरणे वर सवलत अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परिणामी त्या राज्यांच्या मत्स्योत्पादनात वाढ झाल्याचे निर्दर्शनास आले आहे.

### 'यूपीएससी' परीक्षेचा निकाल जाहीर, हर्षिता गोयल दुसऱ्या स्थानावर

# पुण्याचा अर्चित डोंगरे तिसरा तर शक्ती दुबे देशात प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगाने एकूण १००९ उमेदवारांची यादी भारत सरकारकडे देऊन त्यांची शिफारस केली आहे. त्यातील प्रवर्गनिहाय यादी पाहिली तर सामान्य - ३३५, ओबीसी - ३१८, इडब्ल्यूएस - १०९, अनुसुचित जाती - १६०, अनुसुचित जमाती - ८७ अशा पद्धतीने समावेश होतो. त्यातील १८० परीक्षार्थींची निवड आयएएससाठी, ५५ जणांची आयएफएससाठी आणि १४७ जणांची आयपीएससाठी निवड करण्यात आली आहे.

युपीएससी सीएसई निकाल २०२४ संघ लोकसेवा आयोगाच्या अधिकृत वेबसाइटवर upsc.gov.in जाहीर करण्यात आला आहे. आयोगाने २०२४-२५ च्या यूपीएससी टॉपर्सबद्दल सर्व तपशीलांचा उल्लेख करून यूपीएससी मुख्य परीक्षा आणि मुलाखत यांच्या निकालाची पीडीएफ प्रसिद्ध केली आहे. देशात अतिशय प्रतिष्ठित असणाऱ्या नागरी सेवा परीक्षेत शक्ती दुबे यांनी अव्वल स्थान पटकावले. आयोगाने अंतिम निकालात १००९ उमेदवारांची निवड केली.



एकूण १००९ उमेदवारांची यादी भारत सरकारकडे देऊन त्यांची शिफारस केली आहे. त्यातील प्रवर्गनिहाय यादी पाहिली तर सामान्य - ३३५, ओबीसी - ३१८, इडब्ल्यूएस - १०९, अनुसुचित जाती - १६०, अनुसुचित जमाती - ८७ अशा पद्धतीने समावेश होतो. त्यातील १८० परीक्षार्थींची निवड आयएएससाठी, ५५ जणांची आयएफएससाठी आणि १४७ जणांची आयपीएससाठी निवड करण्यात आली आहे.

शक्ती दुबे अव्वल - केंद्रीय लोकसेवा आयोग २०२४ चा अंतिम निकाल मंगळवारी आला आहे. प्रयागराज येथील शक्ती दुबेने संपूर्ण भारतात अव्वल स्थान पटकावले आहे. हर्षिता गोयल दुसऱ्या स्थानावर आहे. तर तिसऱ्या स्थानावर डोंगरे अर्चित पराग आहे. दरवर्षी देशभरातून लाखो उमेदवार यूपीएससीच्या या प्रतिष्ठित परीक्षेत सहभागी होतात. मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सुमारे २८४५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले.

टॉपर्सची यादी- १. शक्ती दुबे २. हर्षिता गोयल ३. अर्चित डोंगरे ४. शाह मार्गी चिराग ५. आकाश गर्ग ६. कोमल पुनिया ७. आयुषी बंसल ८. राजक्रिष्णा झा ९. आदित्य विक्रम अग्रवाल १०. मयांक त्रिपाठी

केंद्रीय लोकसेवा आयोगाने १७ एप्रिल २०२५ पर्यंत णझडउ CSE परीक्षेच्या मुलाखती घेतल्या. णझडउ नागरी सेवा निकाल २०२४ ची पीडीएफ फाईल त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अंतिम युपीएससी गुणवत्ता यादीमध्ये UPSC CSE टॉपर्सची नावे आणि रोल नंबर असतील. मुलाखतीनंतर, उमेदवारांना वैद्यकीय चाचणीसाठी बोलावले जाते. नवी दिल्लीमध्ये अशी नियुक्त रुग्णालये आहेत जिथे डॉक्टरांच्या नियुक्त टीमद्वारे अशी वैद्यकीय तपासणी केली जाते. (सविस्तर वृत्त पान २ वर)

# मराठी हा राज्याचा मानबिंदू ; पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य न करता ऐच्छिक राहणार : ना. भुसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यात राज्यातील विद्यार्थी उद्याच्या स्पर्धेत कुठेही कमी पडू नयेत याचीही दक्षता घेतली जात आहे. सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक असून इंग्रजी भाषा शिकविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. आता नवीन धोरण राबविताना सुकाणू समितीने घेतलेल्या निर्णयानुसार पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा विषय अनिवार्य करण्यात आला होता. तथापि हिंदी भाषा विषय ऐच्छिक ठेवण्याबाबतचा सुधारित शासन निर्णय काढला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले.

राज्यातील शालेय शिक्षण क्षेत्रात व्यापक आणि परिणामकारक सुधारणा घडवून आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने विविध महत्वाचे निर्णय घेतले आहेत. याबाबतची माहिती देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे यांनी मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, एससीईआरटी चे संचालक राहुल रेखावार उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यगीत म्हणून 'गर्जा महाराष्ट्र माझा' गीत सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर सन्मानपूर्वक गायले जाणार आहे. शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, इमारतींची दुरुस्ती, वाचनालय, प्रयोगशाळा, खेळाचे मैदान अशा मूलभूत भौतिक सुविधा पुरवण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कॉपीमुक्त परीक्षा अभियान हे दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये यशस्वीपणे राबवले गेले असून भविष्यात कॉपीच्या प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या शाळांना परीक्षा केंद्र मान्यता नाकारण्यात येईल. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, राज्यभरातील सर्व शाळा व अंगणवाड्यांचे जिओटॅगिंग करण्यासाठी एमआरसॅक पचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. पीएमश्री शाळेच्या धर्तीवर राज्यात 'सीएम श्री' आदर्श शाळा उभारण्यात येणार आहे. तसेच 'आनंद गुरुकुल' उपक्रमाअंतर्गत प्रत्येक विभागात एक निवासी शाळा सुरू करून त्यात कला, क्रीडा व एआय (ख) प्रशिक्षणासह स्पेशालिटी शिक्षण दिले जाईल. शिक्षकांवरील शिक्षणबाह्य कामांचे ओझे कमी करण्यासाठी १५ समित्यांचे एकत्रीकरण करून आता फक्त चार समित्या ठेवण्यात आल्या आहेत. याचबरोबर आदर्श शिक्षक, चांगल्या शैक्षणिक संस्था यांची नोंद घेऊन त्यांचा अनुभव इतर शाळांना लाभावा, यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

## संपादकीय....

### बळकटीकरण

राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मत्स्य व्यवसायाला आजपासून राज्यात कृषीया दर्जा देण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा राज्यातील ४ लाख ८३ हजार मच्छीमारांना फायदा होणार आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्र महाराष्ट्रात कृषी प्रमाणे चांगले उत्पादन आणि उत्पन्न घेण्यास सक्षम आहे. मत्स्य व्यवसायास कृषीचा दर्जा नसल्याने मच्छिमार, मत्स्यसंवर्थक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलतींपासून वंचित राहावं लागत होते. पण महाराष्ट्र राज्यात आता मत्स्य शेतीला कृषीचा दर्जा देऊन मच्छीमार, मत्स्यसंवर्धक आणि मत्स्य कास्तकारांना अनेक पायाभूत सुविधा आणि सवलती उपलब्ध होणार आहेत. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचंदेखील बळकटीकरण होणार आहे. राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये भरीव वाढ होण्याची दाट शक्यता आहे. कृषी क्षेत्रास लागणारे बियाणे, ट्रॅक्टर, तिफन, पाभर, औत, खते इत्यादींकरीता शेतकऱ्यांना लाभ मिळतो. त्याचप्रमाणे मच्छीमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, पॅडलव्हील एअरेटर्स, एअरपंप करीता अनुदान मिळणार आहे. तसेच शीतगृह आणि बर्फ कारखान्याला अनुदान मिळणार आहे. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या पीकविमा प्रमाणे मत्स्य शेतकऱ्यांना, मत्स्य संवर्धकांना मत्स्यबीजांच्या मत्स्योउत्पादनाच्या नुकसानीसाठी मत्स्य विमा योजना मिळणार आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे सरसावल्या; पवई तलावाच्या स्वच्छता उपक्रमाने सुरू केली लोकचळवळ

## जागतिक वसुंधरा दिनी 'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' अभियानाचा मुंबईत थाटात शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पर्यावरण संवर्धनाचा ध्यास सभोवतालच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल. वसुंधरेच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि पर्यावरण क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांच्या सहयोगाने २२ एप्रिल, २०२५ जागतिक वसुंधरा दिनानिमित्त मुंबई येथील पवई तलाव स्वच्छता व संवर्धन अभियानाच्या शुभारंभ सोहळ्याचे आयोजन गणेश घाट पवई येथे करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार दिलीप लांडे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, महानगरपालिका उपायुक्त श्री.संतोष दौड आदी उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी पर्यावरण रक्षणात कर्तव्य आणि हक्क या दोन्ही गोष्टींची जोड देण्याची गरज व्यक्त केली. निसर्गाने मानवाला भरभरून सर्व काही दिले, पण माणसाने मात्र अतिहव्यासाने सभोवतालच्या निसर्गाचे नुकसान केले. निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी शासनाबरोबरच लोकसहभाग आवश्यक आहे. यासाठी आपण वेळीच जागृत होऊन पर्यावरण संवर्धनाचे कर्तव्य बजावण्याची नितांत गरज असून सर्वांनी एकत्र येऊन काम केले तर महाराष्ट्र नक्कीच प्रदुषणुक्त होईल.

नवरात्रीत ज्याप्रमाणे देवीची आराधना केली जाते. त्याप्रमाणे या सृष्टीची, वसुंधरेची आराधना केली पाहिजे. वसुंधरेला वाचविण्यासाठी आपण एकत्र काम केले पाहिजे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जलयुक्त शिवार योजना, लेक माझी भाग्यश्री अशा योजनांना लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जलयुक्त शिवार योजनेतून ग्रामीण विभागात पाणी टंचाईवर मात करण्यात यश मिळाले, हा पूर्वानुभव लक्षात घेऊन पर्यावरण विभाग देखील निसर्ग रक्षणासाठी लोकाभिमुख चळवळ निर्माण करेल. पवई तलावाची स्वच्छता ही या चळवळीची सुरुवात असून नागरिकांचा वाढता सहभाग हे खूप मोठे योगदान ठरेल, असा विश्वास श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला.

'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' अभियानाचा शुभारंभ

आज २२ एप्रिल पासून ते १ मे पर्यंतच्या नऊ दिवसाच्या राज्यस्तरीय 'पर्यावरण वाचवा, वसुंधरा सजवा' या अभियानाचा शुभारंभ देखील यावेळी करण्यात आला. त्यानिमित्त पवई तलाव स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी राज्याचे फूलझाड ताम्हण रोपाचे श्रीमती मुंडे यांच्या हस्ते रोपण करण्यात आले. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून या अभियानाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यात ग्रामपंचायतीपासून ते नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका क्षेत्रात हे पर्यावरण संवर्धन अभियान राबवण्यात येणार आहे.

नऊ दिवस चालणाऱ्या या अभियानात नागरिकांना आपल्या पृथ्वीचे संवर्धन व संरक्षण करण्याच्या प्रत्येकाच्या जबाबदारीचे स्मरण करून देणे व राज्यातील नागरिकांना पर्यावरण रक्षणाच्या चळवळीत सहभागी करून घेणे, असा या अभियानाचा उद्देश असल्याचे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले. या अभियानात पंचमहाभुतांच्या भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश या पाच घटकांपैकी किमान एका घटकावर जागरूक नागरिक म्हणून संकल्प करून काम करावे. स्थानिक स्वराज संस्थांनी पुढाकार घेऊन नैसर्गिक जलस्त्रोतांची स्वच्छता, रिड्यूस, रियूज, रिसायकल यावर आधारित शाळा महाविद्यालयात नवीन प्रयोगांची स्पर्धा, 'पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ' याप्रमाणेच घोषवाक्य स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करून त्याचा पारितोषिक वितरण समारंभ प्रत्येक जिल्ह्यांच्या पालकमंत्री यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी १ मे रोजी करावा, असे आवाहन या अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने केले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिध्देश कदम यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यस्तरावर युवकांशी संवाद साधून निसर्ग संवर्धनाच्या चळवळीत तरूणांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहे, असे सांगितले.

आमदार दिलीप लांडे यांनी पवई तलाव स्वच्छता अभियानाची सुरूवात निश्चितच कौतुकास्पद असून या तलावाचे संवर्धन ही येथील नागरिकांची गरज असल्याची भावना व्यक्त केली.

महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांनी प्रास्ताविकात पर्यावरणप्रेमी सामाजिक संस्थांच्या आग्रही पुढाकाराने हा कार्यक्रम घेतला असल्याचे स्पष्ट करून पर्यावरणवादी संघटनांमुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमात वनशक्ती, निसर्ग संस्थान, हेल्पिंग हॅन्डस्, पर्यावरण दक्षता मंच, बुऱ्हानी फाऊंडेशन, राष्ट्रीय सेवा योजना या संस्थांच्या प्रतिनिधींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

# पंढरपूर शहर व तालुक्यातील अवैध दुध विक्री केंद्रांचा सुळसुळाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपूर शहर व तालुक्यात अनेक अवैध दुध विक्री केंद्र असुन याठिकाणी होते भेसळयुक्त दुध व दुग्धजन्य पदार्थ विक्री होत असून अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य रामभरोसे बनले आहे. असा खळबळजनक गौप्यस्फोट पंढरपूर येथील समाजसेवक महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केला आहे.

**अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष, सर्वसामान्यांचे आरोग्य रामभरोसे!**



एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे त्यांनी माहिती दिली आहे की, काही दिवसांपूर्वीच पंढरपूर तालुक्यातील भोसे गावच्या परिसरात एका दुध डेअरी मध्ये भेसळयुक्त दुध निर्मिती होत असल्याचा गुन्हा उघडकीस आला असुन यामुळे पंढरपुर शहर व तालुक्यात अनेक ठिकाणी दुधात भेसळ करून त्याची विक्री केली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पंढरपूर शहरात जर नजर टाकली तर वेगवेगळ्या भागात अनेक दुध डेअरी आहेत ज्यांची तपासणी अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाचे अधिकारी करत नाहीत, त्यामुळे भेसळयुक्त दुध आणि दुग्धजन्य पदार्थ सर्रासपणे विक्री केले जाते, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला आहे.

तातडीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंढरपूर शहर परिसरातील विविध भागात असलेल्या दुध डेअऱ्यांची तपासणी करावी व जर यामध्ये कोण दोषी आढळले तर त्यावर कडक कारवाई करावी. अशी मागणी गणेश अंकुशराव यांनी केली आहे. जर यावर कारवाई झाली नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू. असा इशाराही गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

# कामगार कायद्यांमध्ये सुधारणा; महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्रीय कामगार संहितेच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ यांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारने १९९९ मध्ये माजी कामगार मंत्री रविंद्र वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा श्रम आयोग नियुक्त केला होता. या आयोगाने सर्व २९ कामगार कायदे एकत्रित करून केवळ चार कामगार संहिता तयार करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार केंद्राने चार संहिता तयार केल्या आहेत. त्यामध्ये वेतन संहिता, औद्योगिक संबंध संहिता, सामाजिक सुरक्षा संहिता आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता यांचा समावेश आहे. या चार संहिताचे अधिनियम संसदेनेही मंजूर केले आहेत. कामगार हा विषय समवर्ती सूचीमध्ये आहेत. केंद्राने सर्व राज्यांसाठी एकत्रित संहिता तयारी केली आहे. या संहितांची अंमलबजावणी सर्व राज्यांमध्ये एकत्रितरित्या करावी लागणार आहे. त्यासाठी राज्यांना संबंधित संहितांच्या अंमलबजावणीसाठी नियम तयार करावे लागणार आहेत. त्यानुसार राज्याच्या कामगार विभागाने महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२५ आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध संहिता नियम, २०२५ तयार केले होते. या नियमांना विधी व न्याय विभागाने काही सुधारणांसह मान्यता दिल्याने या नियमांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार या नियमांचा प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल.

# शहीद अंबादास पवार यांच्या पत्नी कल्पना पवार यांना पोलीस उपअधीक्षक पदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्यात वीर मरण आलेल्या पोलीस शिपाई अंबादास पवार यांच्या पत्नी श्रीमती कल्पना पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पदी नियुक्ती देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीमती पवार यांना परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पदावरील थेट नियुक्तीचे आदेश आज मंत्रालयात प्रदान केले.

'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे नेतृत्व करत असताना त्यांनी सतत सर्वसामान्य जनतेला न्याय दिला आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेणारे व राज्यातील महिलांचे लाडके भाऊ असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहीद पोलीस यांच्या पत्नीस थेट पोलीस उपअधीक्षक पदावरील थेट नियुक्तीचे आदेश दिल्याने त्यांची शहीदांप्रति असलेली संवेदनशीलता दिसून आली आहे, अशी भावना श्रीमती पवार यांनी मुख्यमंत्री व राज्य शासनाचे आभार मानत व्यक्त केली.

श्रीमती पवार म्हणाल्या, 'माझ्या पती प्रमाणेच मलाही देशसेवा करण्याची संधी मिळाली. हे शासन शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे, लाडक्या बहिणींचे आणि देशाच्या रक्षणार्थ प्राणाचे बलीदान दिलेल्या शहीद वीरांचे आहे. हे माझ्या नियुक्तीतून पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.'

**महाराष्ट्रातून ९० हून अधिक उमेदवार यशस्वी**

**अर्चित पराग डोंगरे राज्यात प्रथम तर देशात तिसरा क्रमांक**


# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२४ चा अंतिम निकाल जाहीर झाला असून देशभरातून एकूण १००९ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यातून ९० हून अधिक उमदेवारांनी घवघवीत यश मिळविले आहे. अर्चित पराग डोंगरे राज्यातून प्रथम आले असून देशात ३ रा क्रमांक पटकाविला आहे. तर शिवांश सुभाष जगदाळे यांना २६वी ऑल इंडिया रँक मिळाला आहे. पहिल्या १०० मध्ये राज्यातील ७ उमेदवार आहेत.

राज्यातून यशस्वी झालेले उमेदवार

अर्चित पराग डोंगरे (०३) शिवांश सुभाष जगदाळे (२६) शिवानी पांचाळ (५३) अदिती संजय चौघुले (६३) साई चैतन्य जाधव (६८) विवेक शिंदे (९३) तेजस्वी प्रसाद देशपांडे (९९) दिपाली मेहतो (१०५) ऐश्वर्या मिलिंद जाधव (१६१) शिल्पा चौहान (१८८) कृष्णा बब्रुवान पाटील (१९७) गौरव गंगाधर कायंदे पाटील (२५०) मोक्ष दिलीप राणावत (२५१)प्रणव कुलकर्णी (२५६) अंकित केशवराव जाधव (२८०) आकांश धुळ (२९५) जयकुमार शंकर आडे (३००) अंकिता अनिल पाटील (३०३) पुष्पराज नानासाहेब खोत (३०४) राजत श्रीराम पात्रे (३०५) पंकज पाटले (३२९) स्वामी सुनील रामलिंग (३३६)अजय काशीराम डोके (३६४) श्रीरंग दीपक कावोरे (३९६) वद्यवत यशवंत नाईक (४३२) मानसी नानाभाऊ साकोरे (४५४) केतन अशोक इंगोले (४५८) बच्छाव कार्तिक रवींद्र (४६९) अमन पटेल (४७०) संकेत अरविंद शिंगाटे (४७९) राहुल रमेश आत्राम (४८१) चौधर अभिजीत रामदास (४८७) बावणे सर्वेश अनिल (५०३) आयुष राहुल कोकाटे (५१३) बुलकुंडे सावी श्रीकांत (५१७) पांडुरंग एस कांबळी (५२९) ऋषिकेश नागनाथ वीर (५५६) श्रुती संतोष चव्हाण (५७३) रोहन राजेंद्र पिंगळे (५८१) अश्विनी संजय धामणकर (५८२) अबुसलीया खान कुलकर्णी (५८८) सय्यद मोहम्मद आरिफ मोईन (५९४)वेदांत माधवराव पाटील (६०१) अक्षय विलास पवार (६०४) दिलीपकुमार कृष्ण देसाई (६०५) गायकवाड ऋषिकेश राजेंद्र (६१०) स्वप्नील बागल (६२०) सुशील गिट्टे (६२३) सौरव राजेंद्र ढाकणे (६२८) अपूर्व अमृत बलपांडे (६४९) कपिल लक्ष्मण नलावडे (६६२) सौरभ येवले (६६९) नम्रता अनिल ठाकरे (६७१) ओंकार राजेंद्र खुंताळे (६७३) यश कनवत (६७६) बोधे नितीन अंबादास (६७७) ओमप्रसाद अजय कंधारे (६७९) प्रांजली खांडेकर (६८३) सचिन गुणवंतराव बिसेन (६८८) प्रियंका राठोड (६९६) अक्षय संभाजी मुंडे (६९९)अभय देशमुख (७०४) ज्ञानेश्वर बबनराव मुखेरकर (७०७) विशाल महार (७१४) अतुल अनिल राजुरकर (७२७) अभिजित सहादेव आहेर (७३४) भाग्यश्री राजेश नायकेले (७३७) श्रीतेश भूपेंद्र पटेल (७४६) शिवांग अनिल तिवारी (७५२) पुष्कर लक्ष्मण घोळावे (७९२) योगेश ललित पाटील (८११) श्रुष्टी सुरेश कुल्ये (८३१) संपदा धर्मराज वांगे (८३९) मोहिनी प्रल्हाद खंदारे (८४४) सोनिया जागरवार (८४९) अजय नामदेव सरवदे (८५८) राजू नामदेव वाघ (८७१) अभिजय पगारे (८८६) हेमराज हिंदुराव पनोरेकर (९२२) प्रथमेश सुंदर बोर्डे (९२६) गार्गी लोंढे (९३९) सुमेध मिलिंद जाधव (९४२) आनंद राजेश सदावर्ती (९४५) जगदीश प्रसाद खोकर (९५८) विशाखा कदम (९६२) सचिन देवराम लांडे (९६४) आदित्य अनिल बामणे (१००४)



**केंद्रीय लोकसेवा आयोग नागरी परीक्षा २०२४**

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी सप्टेंबर २०२४ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. जानेवारी - एप्रिल २०२५ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण १००९ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सर्वसाधारण गटातून ३३५, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) १०९, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३१८, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १६०, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ८७ उमेदवारांचा समावेश आहे. एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये ७२५ पुरूष तर २८४ महिला उमेदवार आहेत.

एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये ५० दिव्यांग आहेत. लोकसेवा आयोगाने २३० उमेदवारांची आरक्षित सूची (ठशीर्शीश डळीं) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट ११५, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ३५, इतर मागास वर्ग ५९, अनुसूचित जाती १४, अनुसूचित जमाती ०६, दिव्यांग ०१ उमेदवारांचा समावेश आहे.

**या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू**

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण १८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सर्वसाधारण ७३, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १८ इतर मागास वर्ग (ओबीसी) ५२, अनुसूचित जाती (एससी) २४, अनुसूचित जमाती (एसटी) १३ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण ५५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) २३, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०५, इतर मागास वर्ग (ओबीसी) १३, अनुसूचित जाती (एससी) ०९, अनुसूचित जमाती (एस.टी.) ०५ जागा रिक्त आहेत.

भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण १४७ जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) ६०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १४, इतर मागास प्रवर्गातून ४१, अनुसूचित जाती प्रवर्गातून २२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून १० उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे.

केंद्रीय सेवा गट अ - या सेवेमध्ये एकूण ६०५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - २४४, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ५७ , इतर मागास प्रवर्गातून - १६८, अनुसूचित जाती प्रवर्गातून - ९० तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -४६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

केंद्रीय सेवा गट ब - या सेवेमध्ये एकूण - १४२ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) - ५५, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) १५ उमेदवार, इतर मागास प्रवर्गातून - ४४, अनुसूचित जाती प्रवर्गातून - १५ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून -१३ उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.

एकूण २४१ उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची आहे. अधिकृत निकाल व यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ु.ीींलि. सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

यावर्षीच्या उत्तीर्ण उमेदवारामध्ये महाराष्ट्राचा श्री. डोंगरे अर्चित पराग (रोल क्र. ०८६७२८२) यांनी वेल्लोर व्हीआयटी येथून इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदवीधर (बी.टेक.) असून युपीएससी परीक्षेत तत्वज्ञान हा पर्यायी विषय घेऊन देशभरात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

पहिल्या २५ उमेदवारांमध्ये ११ महिला आणि १४ पुरुष आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता आयआयटी, एनआयटी, व्हीआयटी, जेएनयू, दिल्ली विद्यापीठ आणि अलाहाबाद विद्यापीठ यासारख्या देशातील प्रमुख संस्थांमधून अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, वैद्यकीय विज्ञान आणि वास्तुकला या विषयातील पदवीपर्यंत आहे.

पहिल्या २५ यशस्वी उमेदवारांनी लेखी (मुख्य) परीक्षेत मानववंशशास्त्र, वाणिज्य आणि लेखाशास्त्र, भूगोल, गणित, तत्वज्ञान, भौतिकशास्त्र, राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक प्रशासन, समाजशास्त्र आणि तमिळ भाषेचे साहित्य यासह विविध पर्यायी विषयांची निवड केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हॅंडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.झेड.५४१९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ एप्रिल रोजी साईबाबा चौक येथे घडली. या प्रकरणी गणेश नागनाथ इंदापुरे (वय-३६,रा.मॉंसाहेब मीनाताई ठाकरे शिवसेना,घरकुल,सोलापूर)यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल शेख हे करीत आहे.

### मंदिराजवळून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) विडी घरकुल येथील पोशम्मा मंदिर हॅंडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएस.०२३९ हि अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १९ ते २० एप्रिल दरम्यान घडली.याप्रकरणी व्यंकटेश जयराम बोम्मा (वय-३७,रा. वारदचाळ,मुरारजी पेठ, रामराम चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.

### बस मध्ये चढताना महिलेच्या पर्समधील सोन्याचे गंठण चोरले

सोलापूर (प्रतिनिधी) मार्केट यार्ड समोरील बस स्टॉप येथून सोलापूर महामंडळाच्या बसमधून चुंगी गावी जाण्याकरिता बस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने फिर्यादी माधुरी हनुमंत येवते (वय-३०,रा. कुरनूर, तालुका अक्कलकोट) यांच्या पर्समधील १ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेल्याची घटना २० एप्रिल रोजी दुपारी पावणेतीन वाजण्याच्या सुमारास मार्केट यार्ड येथे घडली.याप्रकरणी माधुरी येवते यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पैकेकरी हे करीत आहे.

### बंद घराचा दरवाजा तोडून घरातील साहित्य लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) बंद घराचा कडी-कोंयडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घरातील लोखंडी कपाट तीन घागरी तांब्याचे एक टेबल फॅन दोन शिलाई मशीन असे साहित्य चोरून नेल्याची घटना २० मार्च ते १६ एप्रिल दरम्यान एसटी कॉलनी सोलापूर येथे घडली.याप्रकरणी श्रीकृष्ण अर्जुनराव अंबुरे (वय-७५,रा. देवदत्त टावर,बाळीवेस) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार हार हे करीत आहेत.

# शेतकऱ्यांनो! उजनी धरण मायनस मध्ये

## मृत्यू पाणी साठ्यांवर यांचा राहणार अधिकार: शेतीचे होणार नुकसान?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

दिनांक १८ एप्रिल रोजी सकाळी उजनी धरणातील पाणी पातळी मायनस (उणे) मध्ये गेली असो, उजनी धरणात एकूण ६३ टीएमसी पाणी शिल्लक राहिले आहे, यापुढे मृत्यूपाणी साठ्यावर जिल्हाधिकाऱ्यांचा अधिकार राहणार असून. या मृत साठ्यातून पिण्यासाठी, शेती आणि उद्योगासाठी पाणीपुरवठा होणार आहे, परंतु सर्व ठिकाणी योग्य प्रमाणात पाणी मिळणार नसल्यामुळे शेतीचे नुकसान होणार आहे हे निश्चित.

१५ ऑक्टोंबर २०२४ रोजी पावसाळा संपल्यानंतर उजनी धरण १११.२० टक्के भरले होते. धरणात १२३.३३ टीएमसी पाणीसाठा तयार झालेला होता. जानेवारी २०२५ मध्ये ४२ दिवसाचे शेतीसाठी कालवा, बोगदा, व सिंचन योजनेतून रब्बी आवर्तन देण्यात आले..

यामुळे नऊ लाख ५० हजार एकर क्षेत्रात पुढील पिकांना लाभ मिळाला यानंतर मार्चमध्ये उन्हाळी आवर्तन सुरू झाले. व हे आवर्तन आता पाणी संपल्या नंतरच ८२ दिवसांनी बंद होणार आहे.

घरामध्ये एकूण पाणीसाठा ४९ ७. ७२० ा पर्यंत केला जातो. ४९१.२० ला उजनी मायनस (उणे) मध्ये जाते व कालवा दरवाज्याची तळपातळी (एमडी डीएल लेवल) ४८७.९१० मीटर पर्यंत आहे व तोपर्यंत कालवा चालू राहतो.

परंतु शेवटी पाण्याचा दाब कमी होतो व पाणी पुढे जात नाही सिंचन योजनेचा देखील यापुढे पाणी कमी पडल्यामुळे त्याही दोन-तीन दिवसात बंद पडणार आहेत तर भीमा सेना व उद्या मध्ये पाण्याचा दाब कमी होत आहे.

एकंदरीत कालवा दहा ते अकरा मी पर्यंत चाललेला परंतु इतर शेतीचे निसर्ग स्तोत्र लवबंद पडणार आहे त्यामुळे ही मे आणि जून अखेरपर्यंत बारमाही उभी असलेली ऊस केळी फळबाग सारखी पिकी पाण्याअभावी जळून जाऊन कोट्यावधी रुपयाची नुकसान होण्याची भीती आहे.

सोलापूर शहरासाठी जानेवारी ते एप्रिल पर्यंत प्रत्येक वेळेस दहा ते अकरा दिवस असे तीन वेळा पाणी सोडले जाते या तीन आवर्तनातून १८ ते २० टीएमसी पाणी सोडावे लागते याचा परिणाम म्हणजे शेतीसाठी उन्हाळ्याच्या शेवटी पाणी कमी पडते व लाखो रुपयांचे नुकसान होते.

उजनी धरणाच्या बॅक वॉटर वर १४ एमआयडीसी पुणे, सोलापूर, अहमदनगर जिल्ह्यातील ५४ साखर कारखाने, वीज निर्मिती केंद्र सिनार मास सारखे मोठे उद्योग व अनेक खाजगी सहकारी परंपरा संस्था चालतात याची देखील भवितव्य पाण्याअभावी बंद पडणार आहे.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाला करिअर कट्टा अंतर्गत चार राज्यस्तरीय पुरस्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेला करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२४-२५ मध्ये स.ब.वि.प्र.समाजाचे सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालयाला अहिल्यानगर जिल्ह्यातून उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय -प्रथम क्रमांकतसेच पुणे उत्कृष्ट विभागीय महाविद्यालय -तृतीय क्रमांक आणि मा.प्राचार्य डॉ. दीनानाथ पाटील यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट विभागीय प्राचार्य प्रवर्तक तर करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा.नवनाथ नागरे यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणून पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,निगडी,पुणे या ठिकाणी या पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक माननीय डॉ.शैलेंद्र देवळाणकर,महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा.यशवंतराव शितोळे,पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई,मा.सचिन इटकर,क्षेत्रीय संचालक महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळ या मान्यवरांच्या उपस्थित स्वीकारताना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रोफेसर डॉ.बाळासाहेब वाघ,पुणे विभागीय प्राचार्य प्रवर्तक तसेच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.दीनानाथ पाटील,जिल्हा समन्वयक व महाविद्यालयीन समन्वयक प्रा.नवनाथ नागरे,करियर कट्टा संसद विद्यार्थी प्रतिनिधी कु.अश्विनी फटांगरे,कु.पायल जोशी यांनी महाविद्यालयाचा पुरस्कार स्वीकारला.

महाविद्यालयाला मागील ३ वर्षात एकूण १० राज्यस्तरीय पुरस्कार मिळणे ही संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी णझडउ, चझडउ, पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण,लेखी परीक्षेची तयारी,बँकिंग परीक्षा,विद्यार्थी संवाद कार्यक्रम,ड ऑन कोर्स,आर्थिक साक्षरता कार्यशाळा असे विविध कोर्सेस घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा समिती वर्षभर प्रयत्न करत असतात.सलग तिसऱ्या वर्षी मिळालेला राज्यस्तरीय पुरस्कार ही संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

या यशाबद्दल माजी महसुल मंत्री मा.ना.बाळासाहेब थोरात,मा.आ.डॉ. सुधीरजी तांबे,मा.आ.सत्यजितदादा तांबे,मा.नगराध्यक्षा सौ.दुर्गाताई तांबे,मा. डॉ.जयश्रीताई थोरात,संस्थेचे सचिव मा.सुमंत कोल्हे,सहसचिव मा.बी.आर. गवांदे,खजिनदार ड.ज्ञानेश्वर सांगळे आणि संचालक तसेच महाविद्यालयचे प्र.प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ,उपप्राचार्य डॉ.विलास कोल्हे,आयक्युएसी समन्वयक डॉ.लक्ष्मण घायवट महाविद्यालय प्रशासकीय अधिकारी मा.श्री.गोरक्षनाथ पानसरे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी यावेळी अभिनंदन केले.

# सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोट आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेत ९८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने सी,बी खेडगी महाविद्यालयात भीमोत्सव प्रश्नमंजुषा स्पर्धेच आयोजन करण्यात आले.




याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. शिवराया आडवीतोटे सर यांच्या हस्ते करण्यात आले.

सम्यक विद्यार्थी आंदोलन आणि रविराज पोटे दरवर्षी चांगले उपक्रम आयोजित करत असतात त्यांनी असेच सामाजिक उपक्रम राबवावे असे प्रतिपादन प्रमुख पाहुण्यांनी केले.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवना विषयी ५० प्रश्न होते आणि या स्पर्धेत ५४ मुली आणि ४४ मुलं एकूण ९८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी डॉ.किशोर थोरे सर, डॉ. आबाराव सुरवसे सर, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे, रोहित उघडे, गंगाराम वाघमारे, दर्शन गायकवाड, श्रीधर दसाडे, प्रीती जैनजांगडे, सुषमा किरगल, सृष्टी गायकवाड, सम्राट सोनकांबळे, सागर मस्के, आदीसह विद्यार्थी मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पंढरपूर अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री उमेश विरधे यांनी सहकारी बँकेच्या अडचणी रजिस्ट्रेशन आधी संदर्भात मुद्दे मांडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

भारताच्या केंद्र सरकारमधील सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मा श्री सतीश जी मराठे, सहकार आयुक्त मा श्री दीपक जी तावरे, साहेब, अम्ब्रेला ऑर्गनायझेशनचे चेअरमन मा ज्योतिद्र मेहता आदी मान्यवर यांच्या उपस्थिती मध्ये सहकार्यात येणारे अडीअडचणी व अम्ब्रेला ऑर्गनायझेशन संदर्भात महाराष्ट्रातल्या प्रमुख सहकारी बँकांची बैठक मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रशिक्षण संस्था गणेश खिंड, पुणे येथे आयोजित केली होती.




याप्रसंगी पंढरपूर अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री उमेश विरधे यांनी सहकारी बँकेच्या अडचणी ग्री लोन मध्ये एग्रीकल्चर डेव्हलपमेंट फंड योजना अंतर्गत नॉन शेड्युल सहकारी बँक रजिस्ट्रेशन करणे आधी संदर्भात मुद्दे मांडले.

यावेळी केंद्रीय मंत्री मोहोळ साहेब, मराठी साहेब यांनी निवेदन स्वीकारले याबाबत सखोल चर्चा केली.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०४ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.** **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिपादन**

# गुलामगिरीच्या पद्धती नष्ट करून गलिच्छ चालीरीतींना मूठमाती दिली पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे,गुलामगिरीच्या पद्धती नष्ट करून गलिच्छ चालीरीतींना मूठमाती दिली पाहिजे. करिता प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले पाहिजे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ९६ व्या व ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर १०४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १३ एप्रिल २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले १३ एप्रिल १९२९ ला चिपळूण येथे आयोजित रत्नागिरी जिल्ह्यातील बहिष्कृत परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, गुलामगिरीची पद्धत नष्ट करणे आमचे कर्तव्य आहे. म्हणून आपल्या समाजातून अगोदर गलिच्छ चालीरीतींना मूठमाती दिली पाहिजे. हे करीत असताना नवीन वैकल्पिक पर्यायी व्यवस्था काय असेल यावर पण स्पष्ट असणे आवश्यक आहे. तसेच १३ एप्रिल १९४७ ला सिद्धार्थ महाविद्यालयात पुराणवस्तू संशोधन व पुराणेतिहास या विषयाचे विद्वान प्रोफेसर रेव्हरंड फादर हेरॉस यांनी नाणी आणि विटा वरील लेख वाचण्यासाठी शोध केला होता. म्हणून त्यांचे मोहें-जो-दरो वर संशोधन पर भाषण झाले.



तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या प्रोफेसरांना आयुष्यात काही महत्त्वाकांक्षाच नाही असे म्हटल्यावर प्रतिक्रिया देताना एक प्रोफेसर म्हणाले की, आम्ही प्रोफेसर मंडळी हल्लीच्या युनिव्हर्सिटी मध्ये मिळणाऱ्या शिक्षण पद्धतीपासूनच निर्माण झालेले आहोत. यासाठी आपणास प्रोफेसरांना दोष देण्यापेक्षा तो युनिव्हर्सिटीच्या शिक्षण पद्धतीलाच द्यावा लागेल. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, प्रोफेसरांनी अध्ययन, अध्यापन व संशोधनाच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले पाहिजे. त्याची न्यूनता पहायला मिळत असल्याने समाजाच्या समस्या स्वरूप बदलून आ-वासून उभ्या आहेत.

जुन्या चालीरीतींना मूठमाती देण्यासाठी प्रवाहाच्या विरुद्ध जाणे सोपे नाही. जो असे करतो त्याला वेडा समजले जाते. तो यशस्वी होतो तेव्हा त्याला वेडा समझणारी इतर माणसे सुद्धा त्याचा स्विकार करीत असतात. तथागत बुद्ध हे महान मानसोपचारतज्ज्ञ होते, तर मग तथागतांचे अनुयायी मानसिक दृष्ट्या समस्याग्रस्त का असावे? तथागतांच्या विचारांचे आदानप्रदान करून त्यांच्या तत्त्वज्ञानानुसार आचरण केल्यास समाजातील सामाजिक समस्यांचे निराकरण होणे शक्य आहे. हे समजून घेण्यासाठी आपण या प्रासंगिक विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना धर्मोदय बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष सुरेश शिनगारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे फळ आम्हाला चाखता येत नसेल तर आमच्या सारखे महामूर्ख आम्हीच आहोत. बुद्ध विहारात लोक का जात नाहीत? याची कारणे शोधली पाहिजेत. लहान लहान बालके वाम मार्गाला लागू नयेत म्हणून बाल संस्कार केंद्रे चालविली पाहिजेत.

सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मिलिंद आठवले प्रमुख वक्ते म्हणून बोलताना म्हणाले की, कार्यशाळेचा उपक्रम म्हणजे आपल्या सर्व प्रश्नांची उकल करण्याची प्रक्रिया आहे. सद्यस्थितीत गुलामगिरीचे स्वरूप बदलले आहे. सामान्य जनतेच्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे ही संशोधकांची जबाबदारी आहे. सर्वांच्या सामाजिक समस्या सर्वसमावेशकतेने सोडविल्या पाहिजेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ ग्रंथ वाचून समजून घेणे आवश्यक आहे.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर हिरामण पाटील म्हणाले की, लौकिक प्राप्त होईल असे कार्य करीत राहिले पाहिजे. विद्यापीठाच्या कार्यप्रणालीवर संतुष्ट न राहता आपण स्वबळावर संशोधन केले पाहिजे. डॉ. रामेश्वर वर्शिळ म्हणाले की, समाजातील कुठल्याही व्यक्तींने आपल्या बुद्धिला पटतील अशा बाबी स्विकारल्या पाहिजेत. अशोक मेश्राम म्हणाले की, जनतेने वाईट चालीरीतींना तिलांजली दिली पाहिजे. टी. एन. थोरात म्हणाले की, आधुनिक गुलामगिरी नाकारली पाहिजे. बायको देव देव करते. नवरा नेमके उलटे कार्य करते. ही विसंगती कधी संपणार आहे. विलास कटारे म्हणाले की, गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. सुभाष ठोकळ म्हणाले की, राज्यकर्त्यांनी जनतेला सत्य माहीतच पडू दिले नाही. याला राज्यकर्त्यांसह सहन करणारे सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. सोहेल पटेल म्हणाले की, केवळ नाचून जयंती साजरी करण्यापेक्षा परदेशात प्रोजेक्टर लावून समजून घेतले जाते. तसा आपणही प्रयत्न केला पाहिजे. एड. सचिन आगरकर म्हणाले की, वक्ता बनविण्यासाठी राबविली जाणारी कार्यशाळेची प्रक्रिया अतिशय महत्त्वपूर्ण आहे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, आजचा प्राध्यापक साडी, गाडी आणि माडी पुरता मर्यादित राहील्याने अध्ययन व संशोधनाकडे दूर्लक्ष होत आहे. प्राध्यापकांकडे बघून विद्यार्थी दूर पळत असतील तर ते योग्य नाही. एड. डी. बी. मेश्राम म्हणाले की, धार्मिक सांगड असली तर मानसिक गुलामगिरीतून मुक्त व्हायला मदत होईल. संग्राम घाटे म्हणाले की, जाती व धर्मात विभाजन करून मानवी समूहात भितीप्रद भावना निर्माण केली जाते ज्यामुळे माणसं संघटीत होत नाहीत.

प्रतीक पंचशील यांनी प्रास्ताविक केले. टी. एन. थोरात यांनी पहाट झाली, प्रभा म्हणाली भीम जयंती आली. हे गीत सादर केले होते. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला एड. विलास रामटेके, इंजिनिअर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, बौद्धाचार्य प्रदीप मिसाळ, बी. बी. मेश्राम, सुरेश शिनगारे, सोहेल पटेल, संदीप नांगरे, अशोक मेश्राम, टी. एन. थोरात, संग्राम घाटे, डॉ. रामेश्वर वर्शिळ, प्राचार्य विलास कटारे, सुभाष ठोकळ, प्रा. शिवम गायकवाड, एड. सचिन आगरकर, एड. डी. बी. मेश्राम, प्रा. डॉ. मिलिंद आठवले इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.